# साखळी सिमेंट काँक्रीट नाला बांध बांधणे कार्यक्रम

१) **<u>राष्ट्रीय कृषि विकास योजना (RKVY) :</u>**

सन २०११-१२ व २०१२-१३ मध्ये साखळी पध्दतीने सिमेंट नाला बांध बांधण्याचा कार्यक्रम राबविण्यात आला आहे. या कार्यक्रमांतर्गत रु.४७.९२ कोटी इतका निधी खर्च झाला असून ८९८ सिमेंट नालाबांध बांधण्यात आले आहेत.

२) **<u>राज्यस्तर योजना :</u>**

टप्पा - १ सन २०१२-१३ मध्ये : राज्यातील टंचाई सदृश परिस्थितीवर मात करण्याच्या दृष्टीने, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांनी माहे ऑक्टोबर,२०११ मध्ये केलेल्या सर्वेक्षणात भूगर्भातील पाण्याची पातळी २ मीटर पेक्षा जास्त खाली गेलेल्या १५ तालुक्यात साखळी पध्दतीने सिमेंट नाला बांध बांधण्याचा महत्वपूर्ण कार्यक्रम राबविण्यात आला आहे.

या १५ तालुक्यातील ४७४ गावांमध्ये एकूण १४८७ इतके सिमेंट नाला बांध बांधण्यात आले आहेत. यावर रु.१४३.४० कोटी निधी खर्च झाला आहे. ते सर्व दिनांक ९ जून ,२०१३ रोजी लोकार्पण करण्यात आले. या बंधा-यांमध्ये २२६४४.६१ सघमी पाणीसाठा होत असून १०३०३ हे. क्षेत्र संरक्षित सिंचनाखाली आले आहे.

टप्पा-२ व ३ सन २०१३-१४ मध्ये या कार्यक्रमास रु.६६५००.०० लक्ष निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला होता. अर्थसंकल्पीत निधीच्या ८०% म्हणजेच रु.५३२००.०० लक्ष निधी वितरित करण्यात आला. या निधीपैकी जादातर निधी हिवाळी अधिवेशनात प्राप्त झाला होता. लोकसभा निवडणूक २०१४ ची आदर्श आचार संहिता दि. ५ मार्च, २०१४ पासून लागू झाल्याने उपरोक्त नमुद टप्प्यात कामे जशी आहेत तशी थांबविण्यात आली होती व मार्च २०१४ अखेर रु. ४२८०२.०० लक्ष निधी समर्पित केला होता.

सन २०१४-१५ साखळी सिमेंट कॉंक्रीट नाला बांध बांधणे कार्यक्रमासाठी रु. २६१००.०० लक्ष नियतव्यय मंजूर असून सर्व निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. त्यापैकी ६० टक्के निधी वितरित करण्यास दि. १ जुलै, २०१४ च्या परिपत्रकान्वये सहमती आहे. या निधीतून शासन निर्णय दिनांक २९ मे, २०१४ दिनांक १८ जुलै,२०१४ व दिनांक ७ ऑगस्ट, २०१४ व दिनांक १३ ऑगस्ट २०१४, ६ सप्टेंबर, २०१४ व ९ सप्टेंबर २०१४ अन्वये असा एकूण रु. १४०१४.७९ लक्ष निधी वितरित करण्यात आलेला आहे.

सन २०१३-१४ मधील टप्पा-२ व टप्पा-३ व इतर योजनेतून बांधण्यात आलेल्या ३२२५ सिमेंट नाला बांधाचे लोकार्पण १४ ऑगस्ट,२०१४ रोजी करण्यात आले आहे. टप्पा-२ व टप्पा-३ मध्ये ऑगस्ट,२०१४ अखेर २७४.६२ कोटी निधी खर्च झाला असून ३०२९ साखळी सिमेंट नाला बंधाऱ्याची कामे पूर्ण झाली आहेत. गतवर्षी सुरु केलेल्या टप्पा-२ व टप्पा-३ मधील कामांना रु. २६८.०० कोटी निधीची आवश्यकता आहे.